August -2022 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue - 301

## Multidisciplinary Issue




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS



August -2022 E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

RESEARCH JOURNEY

Scanned with CamScanner

## INDEX


| No. | Title of the Paper / Name | Author's | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 01 | Status of Mangroves along West Coast of India (Gujarat, Maharashtra and Goa) | Devidas N. Patil, M.J. Kothari | 05 |
| 02 | Ethanobotanical Studies on Aegle marmelose among the Indigenous People of Mahur Taluka, Nanded District, Maharashtra State. | Shivraj Bembrekar, Vijigiri Dinesh, Surya Prakash Rao Pydimarry | 10 |
| 03 | Investment Behavior & Preferences of Women Salaried Employees | Dr. Richa Mehta | 13 |
| 04 | Reflection and Discussion on the Thoughts of Radical Reformer Shri Rajaram Shastri Bhagwat by R.N. Chavan | Manoj Mate | 19 |
| 05 | Microwave-Assisted Synthesis and Study of Thermal Effect of Quinone and Arylamine Polymer | Prachi S. Badave, Dinesh D. Gaikwad, Sanjay D. Gaikwaid | 24 |
| 06 | Role of Consortia in Library Profession | Dr. Sandeep Lande | 28 |
| 07 | The Librarian as a Counsellor | Dr. Neeta Kamble | 36 |
| 08 | The Relationship between Social Intelligence and Happiness among Senior College Students in Nashik District | Dr. Ramesh Nikam, Mr. Rajendra Kadale | 43 |
| 09 | Research Methodology is Away to Solve A Problem in Scientific and Systematic Way -A Study | Dr. Sunita Patil | 48 |
| 10 | An Analysis of Financial Performance of Selected Companies in Pharmaceutical Sector in India | Dr. Richa Mehta | 53 |
| 11 | Reviewing 'Performativity' and 'Women Characters' in Rabindranath Tagore's 'Sacrifice' | Mrs. Kavita Kakhandki, Dr. Abdul Anees Abdul Rasheed | 63 |
| 12 | The Role of Human Resource Management in Academic Library | Prof. Nitesh Motghare | 70 |
| 13 | Nanomaterials in Medicine and Pharmaceuticals with Less Toxicity and More Efficacies | Rohit Srivastava, M R Tanveer | 73 |
| 14 | Digital Information Sources as Part of Library Collection Development | Dr. Vaishali Choudhari | 80 |
| 15 | Impact of Leverage on Profitability of Selected Companies in Cement Industry in India | Rekha Mochi, Dr. Mala Dani | 85 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 16 | 'महाभारत काल में नारी का निरूपण' | डॉ. विमुखभाई पटेल | 92 |
| 17 | वर्तमान सन्दर्भ में भगवतीचरण वर्मा का कथा साहित्य | डॉ. बालाजी जोकरे | 95 |
| 18 | समाज का आधार है भाषा | प्रो. मोहन | 99 |
| 19 | औपनिवेशिक वानिकी दृष्टिकोण के मद्देनजर घासभूमि की उपेक्षा : एक समीक्षात्मक अध्ययन | डॉ सुभाष दोंदे | 104 |
| 20 | 'पोस्ट बॉक्स नं २०३ नाला सोपारा' में चित्रित सामाजिक समस्या | डॉ. महेंद्र रघुवंशी | 111 |
| | **मराठी विभाग** | | |
| 21 | आदिवासी समाज आणि संस्कृती : एक आकलन | डॉ. शशिकांत साळवे | 114 |




'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 301 : Multidisciplinary Issue
Impact Factor 6.522 (SJIF) Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-714
August -2


| No. | Title of the Paper / Name | Author's | Page No. |
|---|---|---|---|
| 22 | समाजपरिवर्तनातील संतांचे योगदान | सौ. तृप्ती तोडकर | 117 |
| 23 | मनोहर ओकांच्या गेंशी कविता : एक चिंतन | डॉ. सुरेश वर्धे | 120 |
| 24 | विठ्ठल वाघ व त्यांची वऱ्हाडी कविता | डॉ. कैलास इंगळे, विठ्ठल होनाळे | 129 |
| 25 | वामन होवाळ यांच्या कथेतून व्यक्त होणारी परिवर्तनवादी विचारधारा | अमोल कवडे | 132 |
| 26 | डॉ. कमलाकर गायकवाड लिखित हेन्री फील्डिंग यांच्या 'जोसेफ अँड्र्यूज' या कादंबरीतील लोभ व ढोंगीपणाचा अभ्यास - समीक्षेची समीक्षा | डॉ. धनराज धनगर | 136 |
| 27 | छत्रपती संभाजी महाराजांवरील ऐतिहासिक लिखाणाचा चिकित्सक अभ्यास | संदिप शिंदे | 139 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार | डॉ.मनोज निकाळजे, डॉ.विजय घोरपडे | 143 |
| 29 | महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेतील महिलांचे राजकीय सक्षमीकरण : एक अभ्यास | डॉ.संजय पाटील, श्री गणेश पाटील | 150 |
| 30 | कृषिसंस्कृतीतील सण - उत्सव | अश्विनी कणसे | 155 |


Scanned with CamScanner

23:43
DOC-20220916...

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 301 : Multidisciplinary Issue
Impact Factor 6.522 (SJIF) Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
August -2022

# वामन होवाळ यांच्या कथेतून व्यक्त होणारी परिवर्तनवादी विचारधारा

**अमोल सुभाष कवडे**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई
इ.मेल amol.kawade99@gmai.com
मो. ९९२१४३३६३८

वामन होवाळ यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील तडसर या गावी एका गरीब कुटुंबात झाला. बालपणापासून त्यांना वाचनाची आवड असल्याने आपणही अशा प्रकारचे लेखन केले पाहिजे हा विचार त्यांच्या मनात निर्माण झाला आणि त्यातून ते लेखनाकडे वळले. बालपण ग्रामीण भागात आणि नंतर नोकरीच्या निमित्ताने मुंबई शहरात वास्तव्य असल्याने त्यांच्या लेखनावर ग्रामीण आणि शहरी जीवनाची छाप पडलेली दिसून येते. विशेषतः ग्रामीण दलित समाज हा त्यांच्या लेखनाचा विषय बनला आहे. असे असले तरी त्यांच्या अनेक कथामधून शहरी दलित समाजाचे चित्रण येताना दिसते. वामन होवाळ यांची कथा केवळ परंपरेने चालत आलेले दलित समाजाचे शोषण, दारिद्र, अस्पृश्यता, दुःख,अंधश्रद्धा यावर न थांबता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित झालेला दलित समाज आणि त्यातून दलित समाजामध्ये झालेल्या परिवर्तनाचा वेध घेताना दिसते. वामन होवाळ यांचे एकूण पाच कथासंग्रह आहेत त्यामध्ये 'बेनवाड'(१९७३), 'येळकोट'(१९८२), 'वारसदार'(१९८६), 'वाटा-आडवाटा'(१९८८), ऑडिट'(२००३) यांचा समावेश होतो. प्रस्तुत शोधनिबंधात प्रस्तुत कथासंग्रहातील कथामधून दलित समाजात झालेल्या परिवर्तनाचा शोध घेतला जाणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दलित तरुणांना दिला. या विचाराने प्रेरित झालेला दलित समाज जुन्या-रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, आपल्यावर होणारा अन्याय-अत्याचार याला विरोध करू लागला याचे प्रत्याकारी चित्रण वामन होवाळ यांनी आपल्या कथामधून केले आहे. 'देव पावला देव घावला' 'नवी पाहट', 'अंगारा', 'येळकोट', उतारा', 'जयंती' या कथांमधून वामन होवाळ यांनी परंपरेने चालत आलेल्या अंधश्रद्धा आणि त्याला विरोध करणारा दलित समाज याचे चित्रण केले आहे, या कथामध्ये येणारे प्रसंग वरवर विनोदी असले तरी त्यांच्या कथेत विविधता आहे. त्यांच्या कथांचा शेवट अनेकदा कलाटणी देणारा ठरतो आणि त्यामुळे त्यांना अपेक्षित असणारा बदल वाचकांसमोर उभे करण्यास वामन होवाळ यशस्वी होतात. वामन होवाळ यांच्या कथालेखनाचा हाच धागा पकडून सुखदेव ढाकणे म्हणतात, "विषम समाज रचना, रूढी परंपरेच्या जंजाळात गुंतून पडलेली माणसे जप,उपहासतापास, गंडेदोरे, करणी, भानामती, असल्या खुळचट, कल्पनांना बळी पडतात. मानसिक शक्तिपात करणाऱ्या या अंधश्रद्धावर हलक्या फुलक्या व विनोदी पद्धतीने प्रहार करतात. येळकोट हे त्याचे उत्तम उदाहरण होय"[१] (पृष्ठ क्र.६३)

'देव पावला देव घावला' या कथेतील यलाप्पा आणि कुसाबाई हे जोडपे देवीच्या नावाने जोगवा मागून उदरनिर्वाह करत असते परंतु जोगवा मागत असताना लोकांचे वेडेवाकडे बोलणे ऐकावे लागत असल्याने एक दिवस कंटाळून सर्व देव एका विहिरीत टाकून काहीतरी कामधंदा करण्यासाठी मुंबईला निघून जातात, सुरुवातीला कुसाबाई आणि यलाप्पा हे अंधश्रद्धेच्या आहारी गेले असले तरी नंतर त्यांच्यामध्ये झालेले परिवर्तन वामन होवाळ या ठिकाणी अधोरेखित करतात. 'नवी पाहट' या कथेतील सागरू पोतराज हा चार घरे मागून उदरनिर्वाह करतो आणि आपल्या मुलगा यानेदेखील हेच करावे असे त्याला वाटते परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित झालेला हनमा याला हे सर्व बदलायचे आहे. त्यामुळे तो आपल्या बापाला



Scanned with CamScanner

म्हणतो की, मी मोलमजुरी करून चार पैसे मिळवतो तू घरात बसून चार घास निवांत खा आणि मानाने जगायला शिक. त्यावर मागरू पोतराज मनाशी म्हणतो की, "खरं आहे आई बी खोटी आणि आईचा वार बी खोटा"[२] (पृष्ठ.क्र. १०९) प्रस्तुत कथेत वामन होवाळ यांनी तरुणांच्या परिवर्तनशील मनोवृत्तीला अधोरेखित केले आहे.

'अंगारा' या कथेतील लखुदादा देवऋषी पणाचे काम करत असल्याने गावातील लोकांना तो हवासा वाटतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला त्याबरोबर गावागावातील दलित बौद्ध धर्माचा अंगीकार करू लागले. त्याचाच परिणाम लखुदादावर देखील झाला आणि त्याने वाढलेले केस कापून टाकले. आता तुला देवीचा कोप होईल याची भीती गावकरी लखुदादाला घालू लागले. त्यावर लखुदादा म्हणतो की, "काय होत न्हाय देवीला मी आळवीन, बाबांनी दावलेला रस्ता मला खड्यात घालणार न्हाय."[३] (पृष्ठ.क्र.१३०) प्रस्तुत कथेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव आणि दलित समाजाने स्वीकारलेला वैज्ञानिक दृष्टीकोन याचा प्रत्यय येतो. 'येळकोट ' ही कथा परिवर्तनाच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण आहे. प्रस्तुत कथेचा नायक देवाला अजिबात न मानणारा आहे परंतु घरातील मुलांचे सतत आजारी पडणे त्यामुळे तो घाबरून जातो आणि त्यावर उपाय म्हणून त्याची बायको जागरण घालण्याचा हट्ट धरते. तिच्या मते लग्नाच्या वेळी जागरण न घातल्याने दवाखाना मागे लागला आहे. परंतु लेखकांच्या मते आजारपण आणि जागरण यांचा काही एक संबंध नसून आजूबाजूच्या घाणीमुळे मुले आजारी पडत आहेत असे तो पत्नीला सांगतो परंतु नाईलाजास्तव तो जागरण घालण्यास तयार होतो. जागरणाच्या लंगर तोडण्याच्या वेळी खूप प्रयत्न करूनही कुटुंबातील सदस्याला लंगर तुटत नाही परंतु सकाळी प्रातविधीला जाणारी व्यक्ती सहज लंगर तोडते हे पाहून लेखक सर्व देव उधळून लावतो. प्रस्तुत कथेतून वामन होवाळ यांनी अंधश्रद्धा नाकारणाऱ्या नायकाची व्यक्तिरेखा उभी केली आहे.

अंधश्रद्धे आहारी गेलेली माणसे स्वतःची फसगत करून घेतात, देव,धर्म, करणी, भानामती याच्या नावाखाली काही प्रवृत्ती लोकांना कशाप्रकारे लुबाडतात याचे चित्रण वामन होवाळ यांनी अनेक ठिकाणी केले आहे. परंतु कालांतराने का असेना समाजात झालेले परिवर्तन वामन होवाळ जागोजागी अधोरेखित करतात. 'उतारा' या कथेतील सोना पालीच्या यात्रेला जाऊन आल्यापासून एकसारखी घुमत होती यावर उपाय म्हणून लोक शिवरामला जागरण घालण्यास सांगतात, जागरणातील ढोलकीच्या आवाजाने भानावर आलेल्या सोनाला शिवराम समजावून सांगतो की, करणी भरणी काही नसते आपल्या मनाचा सर्व खेळ असतो. त्याचबरोबर 'जयंती' या कथेत डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करत असताना सोसायटी मध्ये सत्यनारायण पूजा घालण्याचा आग्रह करतो त्यावेळी त्याला सर्वजण विरोध करतात. अशा प्रकारे अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांना विरोध करणारा परिवर्तनवादी दलित समाज वामन होवाळ वाचकांसमोर उभा करतात. 'काळपाणी' या कथेत दलित समाजातील लोकांनी बौद्ध धर्मात प्रवेश केला आणि परंपरेने चालत आलेली गावकीची कामे करण्यास नकार दिला आहे तर, राघुदादा या कथेत राघुदादा सनई वाजवण्याचे काम करतो. मुलगा शहरात शिकायला गेल्याने त्याच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव पडला आणि त्याने बौद्ध धर्मात प्रवेश केला तेंव्हापासून राघुदादा देव देवता आणि सनई वाजविणे सोडून देतो .

'मजल्याच घर' या कथेतील बयाजी हा गोदीमध्ये काम करत असला तरी त्याने आपल्या सर्व मुलांना चांगल्याप्रकारचे शिक्षण दिले आहे . त्यामुळे त्याच्या मुलामध्ये झालेले परिवर्तन वामन होवाळ अधोरेखित करतात, कुडाच्या, सारवलेल्या घरात राहणारा दलित समाज दुमजली घरात राहण्याचे स्वप्न पाहू लागला परंतु प्रस्थापित समाजाला दलितांची ही प्रगती पाहवत नाही . बयाजीने बांधलेल्या दुमजली घराला जेंव्हा गावकरी आग लावतात आणि त्यामध्ये बयाजीचा मृत्यू होतो, तेंव्हा त्याची मुले बदल्याची भाषा न करता, दुःखःघेवून घरात न बसता आपल्या वडिलांच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून नवीन दुमजली घराची पायाभरणी



'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 301 : Multidisciplinary Issue
Impact Factor 6.522 (SJIF) Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
August -2022

करतात. या ठिकाणी खऱ्या अर्थाने बाबासाहेबांच्या विचारांचा विजय झाल्याचे वामन होवाळ दाखवून देतात. 'वाटा-आडवाटा' या कथेत दलित समाजातील बनसोडे गुरुजी यांचा मुलगा मिलिंद आणि केशवराव कुलकर्णी यांची मुलगी यांच्या आंतरजातीय विवाहाचे चित्रण केले आहे, बनसोडे गुरुजी यांची पत्नी मुलीच्या आईबापाची

Scanned with CamScanner

करतात. या ठिकाणी खऱ्या अर्थाने बाबासाहेबांच्या विचारांचा विजय झाल्याचे वामन होवाळ दाखवून देतात. 'वाटा-आडवाटा' या कथेत दलित समाजातील बनसोडे गुरुजी यांचा मुलगा मिलिंद आणि केशवराव कुलकर्णी यांची मुलगी यांच्या आंतरजातीय विवाहाचे चित्रण केले आहे, बनसोडे गुरुजी यांची पत्नी मुलीच्या आईबापाची चिंता करते तेंव्हा गुरुजी तिला सांगतात की, जाती पाती हे सर्व खोटं आहे संपूर्ण मानव एकच आहे. शिवाय बुद्धधम्माची दीक्षा घेताना सुजाता 'मी ब्रम्हा, विष्णू, महेश यांना देव मानणार नाही, राम, वामन, कृष्ण यांना देव मानणार नाही' अशी प्रतिज्ञा करते. प्रस्तुत कथेत वामन होवाळ यांनी समाजातील बदलत्या विचारधारेचे वास्तवदर्शी दर्शन घडविले आहे. समाजातील दोन विचार, दोन संस्कृती, दोन समाज, दोन धर्म, एकत्र येण्याची प्रक्रिया कशा प्रकारे रुजत आहे हे प्रभावीपणे रेखाटले आहे .

'तपास' या कथेतील अधिकारी असणारे मानेसाहेब गावात आयोजित केलेल्या बाबासाहेबांच्या जयंतीला प्रमुख पाहुणे म्हणून जाणार असतात त्यामुळे ते वेगळ्याच आनंदात असतात. मानेसाहेबाना गाव, गावची माणसे, गावची माती याविषयी आपुलकी असते. त्यामुळे बाबासाहेबांचे विचार गावातील लोकांना सांगायला मिळतील याचा त्यांना विशेष आनंद झालेला असतो. बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित झालेला समाज उच्च शिक्षण घेऊ लागला आणि मोठ्या पदावर जाऊन आपल्या लोकांना देखील योग्य मार्गदर्शन करू लागला आणि आंबेडकरांचे विचार समाजाला पटवून देवू लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना असणारे स्थान आणि त्यांच्याविषयी असणारा श्रद्धाभाव प्रस्तुत कथेत प्रकट केला आहे. दलित समाजातील व्यक्ती उच्च पदावर जाते आणि आपल्या गावाची, जातीची, मित्रांची ओळख द्यायला लाजते अशा लोकांच्या डोळ्यात अंजन घालणारी ही कथा आहे. 'माझंही विद्यापीठ' या कथेतील जयंत वाघमारे मुंबई विद्यापीठात एम.ए ला प्रवेश घेतात आणि 'आंबेडकरी प्रेरणेच्या कथा किंवा साजन शेवाळ यांच्या कथेतील सामाजिकता' हा विषय निवडण्याचा प्रयत्न करतात. या ठिकाणी वामन होवाळ यांनी बदलत्या दलित समाजाचे चित्रण केले आहे. या ठिकाणी दलित समाजात होणारे शैक्षणिक परिवर्तन आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणविषयक विचार समाजात कशा प्रकारे खोलवर रुजत आहे शिवाय जातिव्यवस्थेची बांधणे झुगारून दलित तरुण कशा प्रकारे आपले अस्तित्व सिद्ध करत आहे हे प्रभावीपणे मांडले आहे.

**समारोप :**

वामन होवाळ यांच्या कथांचा विचार करत असताना त्यांच्या कथांची अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात, त्यापैकीच बदलत्या समाजजीवनाचा वास्तव अंगाने त्यांनी घेतलेला वेध हे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य सांगता येईल. त्यांची कथा केवळ दलित समजापुरती मर्यादित नाही, त्यांनी बदलत्या ग्रामीण समाजजीवनाचे देखील तितक्याच प्रभावीपणे चित्रण केले आहे, ग्रामीण जीवनातील विविध वृत्ती-प्रवृत्ती त्यांच्या कथालेखनाचा विषय बनल्या आहेत, समाजातील ढोंगी प्रवृतीचा ते खरपूस समाचार घेतात. प्रामुख्याने ग्रामीण दलित समाज हा त्याच्या कथांचा केंद्रबिंदू असल्याचे त्यांच्या कथा वाचल्यानंतर जाणवते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित झालेला दलित समाज शिक्षणाच्या प्रवाहात आला आणि आपल्या पूर्वजांनी वर्षानुवर्षे सहन केलेल्या अन्यायाला विरोध करू लागला. रूढी, परंपरा, अंधश्रद्धा याला विरोध करू लागला, देवता पूजन नाकारू लागला, परंपरेने चालत आलेली गावकीची कामे करण्यास विरोध करू लागला, अशा प्रकारचे दलित समाजात झालेले वैचारिक, वैज्ञानिक, शैक्षणिक, सामाजिक परिवर्तन वामन होवाळ यांनी त्यांच्या कथांमधून अधोरेखित केले आहे.

**संदर्भ : -**

१. ढाकणे सुखदेव, बाबुराव बागुल व्यक्ती आणि वाङ्मय, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, दु.आ.२००६ पृष्ठ क्र.६३.





२. होवाळ वामन, वाटा – आडवाटा, स्वयंदीप प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. १९८८ पृष्ठ.क्र. १०९
३. होवाळ वामन, वारसदार, स्वयंदीप प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. १९८६, पृष्ठ.क्र.१३०
४. होवाळ वामन, बेनवाड, सहयोग प्रकाशन, कोल्हापूर, दु.आ. २०००
५. होवाळ वामन, येळकोट, छत्रपती प्रकाशन, मुंबई,
६. होवाळ वामन, ऑडीट, निशिराज पब्लिकेशन, पुणे

Scanned with CamScanner